सरकारतर्फे साक्षीदार क्र.३ चा सरतपासः- निशाणी क्र.७२

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,
माझे नावः - भाऊसाहेब ऊर्फ बाबासाहेब मारुती कांगुणे
वय - ५३ वर्षे, व्यवसाय- शेती
राहणार - नेवासा बुद्रुक, ता.नेवासा, जिल्हा -अहमदनगर.

अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एम.के.सोनवणे यांचे मार्फत सुरुः-

मी आरोपींना क्र.१ व २ यांना ओळखतो कारण ते ग्रामपंचायत नेवासाबु. येथे काम करत होते. आरोपी क्र.२ हा स्वयंरोजगार म्हणुन काम पाहत होता. व आरोपी क्र.१ हा रोजगार हमी योजनेअंतर्गत नर्सरीचे काम पाहत होता. मी सन २०१३ मध्ये ग्रामपंचायत नेवासा बु.येथे सरपंच म्हणुन काम पाहत होतो. सन २०१३ साली आरोपी क्र.१ यास नर्सरीचे काम दिले होते. त्यावेळी राजु सत्यदान जाधव याची आई सुभद्राबाई सत्यदान जाधव ही सन २०१६ साली मयत झाली. त्यावेळी सुभद्राबाई हिचे अंत्यविधीसाठी गेलो होतो तेव्हा आम्हाला समजले की, मालनबाई देवराम जाधव हि दिनांक २७/०१/२०१० रोजी मयत असताना देखील आरोपी क्र.१ व २ यांनी मयत मालनबाई हिच्या नावाने जॉबकार्ड तयार केले व रोजगार हमी योजनेतील ३२००/- रुपये निधी मयत व्यक्तीच्या नावाने काढला. त्यानंतर आरोपींविरुध्द गुन्हा दाखल झाला. मी आरोपींना पाहिल्यास ओळखु शकतो. आरोपी आजरोजी न्यायालयात हजर नाही.

सरतपास पूर्ण.

उलटतपास आरोपी क्र. १ तर्फे ॲड. बी.जी. झावरे यांचे मार्फत सुरु.

२. आरोपी क्र.१ चे वडील हे सन २०१८ च्या दरम्यान मयत झाले. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर आरोपी क्र.१ चे आई व भाऊ कॅन्सर आजाराने मयत झाले. आरोपींना रोपवाटिका शासनाने कोणत्या साली मंजुर केली होती हे मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, रोपवाटिका शासनाने आरोपी क्र.१ चे वडीलांना मंजुर केली होती. हे म्हणणे खरे आहे की, रोपवाटिका येथे काम पाहण्यासाठी कोणाची नेमणुक करावयाची हे ग्रामसेवक ठरवत असे. रोपवाटिका येथे काम करण्यासाठी येणाऱ्यांची हजेरी घेण्याची जबाबदारी ग्रामसेवक यांच्यावर होती किंवा कसे हे मी सांगु शकत नाही. हे मला सांगता येणार नाही की, सन २०१३ साली मी कार्यरत असताना

मालनबाई हिच्या मृत्युची नोंद कार्यालयात झालेली होती किंवा कसे?

३. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१ व २ यांनी मयताच्या नावे जॉबकार्ड काढले याची माहिती मला इतरांकडुन समजली. सदर जॉबकार्डच्या अनुषंगाने पोस्ट मास्तर यांची नोकरी गेली किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. सदर प्रकरणाची तक्रार निवारण केंद्र जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर येथे चौकशी झाली किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. हे मला सांगता येणार नाही की, दि.२३/११/२०१२ रोजी सुभद्राबाई हिने तक्रार निवारण केंद्र अहमदनगर येथे जबाब दिला किंवा कसे. (आता साक्षीदारास उलटतपासादरम्यान आरोपीतर्फे सुभद्राबाई सत्यदान जाधव यांचा दिनांक २३/११/२०१२ रोजीचा जबाब दाखविण्यात आला.) सदर जबाबातील मजकुर आज रोजी प्रथम वाचला. त्यातील मजकुर खरा आहे किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. (सदरचा जबाब उलटतपासादरम्यान साक्षीदारास दाखविण्यात आला असल्याने त्यास निशाणी ७३ देण्यात येते.) सदर जबाबावर सुभद्राबाई हिचा अंगठा आहे किंवा कसे हे मी सांगु शकत नाही परंतु, त्यावर अंगठा आहे. त्यावर ग्रामविकास अधिकारी यांची सही दिसुन येते परंतु, ती सही त्यांची आहे किंवा कसे हे मी निश्चित सांगु शकत नाही. हे मला सांगता येणार नाही की, सुभद्राबाई हिने तिच्या हयातीमध्ये रक्कम रुपये ३२६०/- चलनाने भरले किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ च्या वडिलांना कोणत्या गटात रोपवाटिका मंजुर झाली हे मला सांगता येणार नाही. हे मला सांगता येणार नाही की, आरोपी क्र. १ व २ यांचेसोबत गावातील इतर लोक कामाला होते किंवा कसे? (आता साक्षीदारास उलटतपासादरम्यान दिनांक २२/११/२०१२ रोजीचे पोस्टाचे पत्र दाखविले) सदर पत्रातील मजकुराबाबत मला काहीएक सांगता येणार नाही. सदर रक्कम आरोपी क्र. ३ हिने भरले किंवा कसे हे मी सांगु शकत नाही. (सदरचा जबाब उलटतपासादरम्यान साक्षीदारास दाखविण्यात आला असल्याने त्यास निशाणी ७४ देण्यात येते.) हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. ३ ने कोणत्या साली स्वयं रोजगारचे पैसे घेतले हे मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ ते ३ यांनी स्वयं रोजगाराचे पैसे किती वेळा घेतले हे मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, रोपवाटिका कोणत्या साली मंजुर झाली हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, रोपवाटिका कधी बंद झाली हेही मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. ३ हिने आरोपी क्र. १ व २ च्या मदतीने मयताच्या नावचे जॉबकार्ड तयार केलेबाबतचा मी कोणताही दस्ताऐवज स्वत: पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही

की, आरोपी क्र. १ व २ यांनी ग्रामपंचायत निवडणूकीमध्ये विरुध्द बाजुने प्रचार केल्यामुळे मी त्यांचेविरुध्द खोटा जबाब देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी कोणताही गुन्हा केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, राजकिय द्वेषातून मी आरोपींविरुध्द खोटा जबाब दिला.

उलटतपास आरोपी क्र. २ तर्फे ॲड. आर. एम. मुंगसे यांचे मार्फत आरोपी क्र. १ तर्फे घेण्यात आलेला उलटतपास स्विकारण्यात आला.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

सही/-

(ए.एन.सरक)

दिनांक- २५/०८/२०२५. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.३, नेवासा